# जालना नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली
# श्री संत मुक्ताबाई पालखीचा रिंगण सोहळा उत्साहात

सोमवार दि. ०६ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३०५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282







## जे.ई.एस. महाविद्यालयाच्या मैदानावर हजारो वारकरी भक्तांची उपस्थिती; टाळ-मृदुंग, हरिनामाच्या गजरात अविस्मरणीय भक्तिमय वातावरण

**जालना । प्रतिनिधी**

आषाढी वारीच्या पवित्र पर्वाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील जे.ई.एस. महाविद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर श्री संत मुक्ताबाई पालखीचा भव्य रिंगण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. हरिनामाच्या अखंड गजराने, टाळ-मृदुंगाच्या निनादाने आणि ''ज्ञानोबा-तुकाराम'', ''जय मुक्ताई''च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. हजारो वारकरी, महिला-पुरुष, युवक-युवती आणि भाविकांनी मोठ्या श्रद्धेने या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहून संत परंपरेप्रती आपली निष्ठा व्यक्त केली.


या भव्य रिंगण सोहळ्यास मुक्ताईनगर संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. रवींद्र पाटील महाराज, पालखी सोहळ्याचे अध्यक्ष ह.भ.प. रवींद्र महाराज हरणे तसेच रिंगण सोहळ्याचे अध्यक्ष ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण सोहळा अत्यंत नियोजनबद्ध आणि शिस्तीत पार पडला.

या प्रसंगी खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुनराव खोतकर, आमदार नारायण कुचे, मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील, महापौर वंदना मगरे, जिल्हाधिकारी सौ. आशिमा मित्तल, महानगरपालिका आयुक्त सौ. अंजली शर्मा, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, पोलीस अधीक्षक तेकबीर सिंग संधू, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विक्रम साळी, पोलीस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी, महानगरपालिका उपअभियंता सौ. कोमल गावंडे, नगरसेविका सौ. श्रद्धा साळवे, सौ. संध्या देठे, महानगरपालिकेचे विजय फुलंब्रीकर, सय्यद सौद, भाऊसाहेब घुगे, पंडित दादा भुतेकर, ह.भ.प. बाबुराव व्यवहारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित (पान २ वर)





## महानगरपालिकेच्या शाळा दर्जेदार बनविण्यासाठी प्रयत्न; शिक्षण सभापती भाग्यश्री जोगस यांचे आश्वासन



**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या शाळांच्या सर्वांगीण विकासासंदर्भात महानगरपालिकेच्या सभागृहात मुख्याध्यापक व शिक्षकांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत शाळांमधील विविध समस्या, सुविधा आणि शैक्षणिक गुणवत्तेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला शिक्षण व विद्युत सभापती भाग्यश्री सुजित जोगस, उपसभापती वैशाली राऊत, नगरसेवक अमोल ठाकूर तसेच महानगरपालिकेचे मुख्याध्यापक, शिक्षक व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान शिक्षकांनी शाळांमधील पायाभूत सुविधा, मनुष्यबळ व शैक्षणिक कामकाजाशी संबंधित विविध समस्या मांडल्या. यावर सकारात्मक चर्चा करत प्रभाग क्रमांक १६ मधील ४८८ परिसरात नवीन महानगरपालिका शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव नगरसेवक अमोल ठाकूर यांनी मांडला.

यावेळी शिक्षण सभापती भाग्यश्री सुजित जोगस यांनी, ''महानगरपालिकेच्या शाळा अधिक दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थ्यांसाठी आकर्षक बनविण्यासाठी आवश्यक त्या सर्व स्तरांवर प्रयत्न केले जातील,'' असे आश्वासन दिले. बैठकीत (पान २ वर)

## रोहिणा पुलावर टायर फुटल्याने खासगी बस पलटी झाल्याने ११ जण जखमी

**परतूर - प्रतिनिधी**

दि.०५/०७/२०२६, रोजी सातारा जिल्ह्यातील कराड येथून साखरपुड्याचा कार्यक्रम आटोपून बुलढाणा जिल्ह्यात परतणारी खासगी बस परतूर तालुक्यातील रोहिणा पुलावर उलटली. या अपघातात ११ जण जखमी झाले.दरम्यान, सुभाष पळसकर (रा. डोणगाव ता. मेहकर जि. बुलढाणा ) यांनी दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी घटनेची नोंद केली आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की,बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव येथील सुभाष पळसकर यांच्या नातवाचा साखरपुड्याचा कार्यक्रम कराड येथे आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम आटोपून सर्वजण गावाकडे परतत होते. दरम्यान,



त्यांची खासगी बस (क्र.ए. पी. ०५ सी २९२६) परतूर शहराजवळील रोहिणा पुलावर टायर अचानक फुटल्याने बस चालकाचे नियंत्रण सुटून बस पलटी झाली. या अपघातात समीक्षा पळसकर (वय १८), सारिका पळसकर (३०),पल्लवी शिंगणे (२८),नम्रता पळसकर (२०),सई पळसकर (१३) (पान २ वर)

## जालना ते लंडन थारमधून ऐतिहासिक कार प्रवास; बजाज दाम्पत्याचा भास्कर दानवे यांच्या हस्ते सत्कार

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील हौशी कारचालक राजेश बजाज व सौ. सोनी बजाज यांनी आपल्या थार गाडीने जालना ते लंडन असा ऐतिहासिक व प्रेरणादायी कार प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचा सत्कार केला.

यावेळी बजाज दाम्पत्याशी संवाद साधताना त्यांनी या ७१ दिवसांच्या आंतरराष्ट्रीय प्रवासातील विविध अनुभव सांगितले. भारतासह १९ देशांमधून तब्बल १७,६८३ किलोमीटरचे अंतर त्यांनी स्वतः वाहन चालवत पूर्ण केले. या



मोहिमेसाठी त्यांनी मागील तीन वर्षांपासून आवश्यक नियोजन, कागदपत्रांची पूर्तता, वाहनाची तयारी तसेच विविध देशांतील वाहतूक नियमांचा सखोल अभ्यास केला होता.

एडव्हेंचर्स ओव्हरलँड, गुरुग्राम यांच्या वतीने आयोजित ही मोहीम १४ एप्रिल ते १९ जून २०२६ या कालावधीत पार पडली. जालन्यातील लोखंडी पुलावरून प्रवासाला प्रारंभ झाल्यानंतर गोरखपूर येथून अधिकृत मोहिमेला सुरुवात झाली. भारत, नेपाळ, चीन, किर्गिस्तान, उझबेकिस्तान, कझाकस्तान, रशिया, जॉर्जिया, तुर्किये (पान २ वर)

# संपादकीय....

## विश्वास, गुणवत्ता आणि जबाबदारीचा प्रश्न

महाराष्ट्राच्या विकासाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या समृद्धी महामार्गाशी संबंधित कथित अवैध मुरूम उत्खनन, गुणवत्तेबाबत उपस्थित झालेले प्रश्न आणि त्यानंतर परतूर पोलिसांत गुन्हा दाखल होणे ही केवळ एक प्रशासकीय घटना नाही. हा विषय सार्वजनिक निधी, शासकीय उत्तरदायित्व आणि विकासकामांवरील नागरिकांच्या विश्वासाशी थेट जोडलेला आहे. देशातील मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर हजारो कोटी रुपयांचा खर्च केला जातो. त्यामुळे अशा प्रकल्पांमध्ये गुणवत्ता, पारदर्शकता आणि कायद्याचे पालन ही केवळ तांत्रिक आवश्यकता नसून लोकशाहीतील उत्तरदायित्वाची कसोटी असते. कोणत्याही मोठ्या प्रकल्पात अनियमिततेचे आरोप झाले तर त्याकडे राजकीय आरोप-प्रत्यारोप म्हणून न पाहता वस्तुनिष्ठ चौकशीच्या दृष्टीने पाहणे आवश्यक ठरते. या प्रकरणात एका लोकप्रतिनिधीने विधानसभेत मुद्दा उपस्थित केला, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी फिर्याद दिली आणि त्यानंतर गुन्हाही दाखल झाला. ही प्रक्रिया लोकशाही व्यवस्थेतील संस्थात्मक यंत्रणा कार्यरत असल्याचे दर्शवते. मात्र गुन्हा दाखल होणे म्हणजे आरोप सिद्ध झाले, असा अर्थ होत नाही. त्याचप्रमाणे आरोप झाले म्हणून त्याकडे दुर्लक्षही करता येणार नाही. सत्याचा शोध हा निष्पक्ष तपासातूनच लागतो. या प्रकरणातील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे तलावाच्या संरक्षणभिंतीलगत झाल्याचा दावा असलेले उत्खनन. जर चौकशीत हे सत्य आढळले, तर हा केवळ महसुलाचा विषय राहणार नाही; तो सार्वजनिक सुरक्षिततेचा विषय ठरेल. जलसाठ्यांची सुरक्षितता धोक्यात आल्यास शेती, पर्यावरण, स्थानिक अर्थव्यवस्था आणि मानवी जीवितावर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. त्यामुळे अशा आरोपांची वैज्ञानिक आणि तांत्रिक पडताळणी अत्यावश्यक आहे. याचबरोबर समृद्धी महामार्गाच्या भरावाच्या गुणवत्तेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. आधुनिक द्रुतगती महामार्गाचे आयुष्य, सुरक्षितता आणि देखभाल यांचा पाया गुणवत्तापूर्ण बांधकामावर अवलंबून असतो. जर निर्धारित मानकांमध्ये कुठेही तडजोड झाली असेल, तर त्याची किंमत भविष्यात अपघात, दुरुस्तीवरील वाढता खर्च आणि सार्वजनिक निधीच्या अपव्ययाच्या स्वरूपात मोजावी लागू शकते. या प्रकरणाने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर आणला आहेमोठ्या सार्वजनिक प्रकल्पांमध्ये केवळ कंत्राटदारच नव्हे, तर देखरेख करणाऱ्या यंत्रणांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची असते. गुणवत्ता नियंत्रण, प्रयोगशाळा चाचण्या, जीपीएस पडताळणी, साइट निरीक्षण आणि नियमित लेखापरीक्षण या प्रक्रिया केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे राबवल्या गेल्या पाहिजेत. कारण विकासकामातील प्रत्येक त्रुटीचा आर्थिक आणि सामाजिक भार शेवटी करदात्यांनाच सहन करावा लागतो. या प्रकरणातून शासनालाही काही मूलभूत धडे घेण्याची गरज आहे. सर्व मोठ्या प्रकल्पांमध्ये डिजिटल मॉनिटरिंग, ड्रोन सर्वेक्षण, रिअल-टाइम जीपीएस ट्रॅकिंग, स्वतंत्र तृतीय पक्ष गुणवत्ता तपासणी आणि सामाजिक लेखापरीक्षण यांना अधिक बळ दिल्यास भविष्यात अशा वादांना मोठ्या प्रमाणात आळा बसू शकतो. समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्यामुळे या प्रकल्पावरील प्रत्येक प्रश्नाचे उत्तरही तितक्याच पारदर्शकतेने मिळाले पाहिजे. चौकशी निष्पक्ष, वेळेत आणि पुराव्यांच्या आधारे पूर्ण झाली पाहिजे. दोषी कोणीही असो, त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे; आणि आरोप निराधार ठरल्यास तेही स्पष्टपणे जनतेसमोर आले पाहिजे.

# आर्थिक विकास महामंडळाच्या बाबतीत सरकार;कलाल-कलार समाजाची अवहेलना का करीत आहे? इतर समाजाप्रमाणे आर्थिक विकास महामंडळ जाहिर करण्यात विलंब का?

गेल्या पाच वर्षांपासून कलाल-कलार समाजाला न्याय मिळावा यासाठी ''महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना'' सातत्याने सरकार दरबारी संपूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करीत आहे.परंतु सरकारला अजुनपर्यंत इतर समाजाप्रमाणे कलार-कलाल समाजाच्या प्रती जाग आलेला दिसत नाही ही समाजाच्या प्रती शोकांतिका म्हणावी लागेल.सरकारने आतापर्यंत मराठा समाज, ब्राह्मण समाज, राजपूत समाज, वीरशैव लिंगायत समाज,वडार समाज,गुरव समाज, रामोशी समाज इत्यादी समाजाला सरकारने आर्थिक विकास महामंडळ जाहिर केले आहे.यात काही समाजानी आर्थिक विकास महामंडळाची मागणी किंवा आंदोलन सुध्दा केले नाही अशाही काही समाजाला सुध्दा सरकारने आर्थिक विकास महामंडळ जाहिर केले आणि त्यांचे कार्य सुरू आहे.परंतु गेल्या पाच वर्षांपासून सतत पाठपुरावे आंदोलन, निवेदन देऊन आणि संपर्कात असुन सुद्धा सरकार कलार-कलाल समाजाकडे दुर्लक्ष करीत आहे ही महाराष्ट्र सरकारकडून लोकशाहीची विटंबनाच म्हणावी लागेल. समाजाला न्याय मिळावा यासाठी २०२२ मध्ये नागपूर विधानसभेवर मोर्चा काढण्यात आला होता, यानंतर २०२३ मध्ये पुन्हा नागपूर विधानसभेवर भव्य मोर्चा काढण्यात आला आणि नुकताच ७ आक्टोंबर २०२५ ला मुंबई येथे आझाद मैदानावर मोठे आंदोलन करण्यात आले होते.यादरम्यान सुद्धा संबंधित खात्याचे मंत्री महोदय अतुलजी सावे यांना निवेदन देण्यात आले. याव्यतीरीक्त वेगवेगळ्या मंत्र्यांना व संबंधित मंत्रीमहोदयांना निवेदन देऊन व मेल व्दारे पत्रव्यवहार करून समाजाच्या समस्यांबद्दल अवगत सुध्दा करण्यात आले. मोर्च्यादरम्यान व आंदोलनादरम्यान सरकारला समाजाच्या मागण्यांचे वेळोवेळी निवेदने व पाठपुरावा सुध्दा करण्यात आला.सोबतच संबंधित मंत्री,मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना आतापर्यंत अनेकदा पाठपुरावा सुध्दा केलेला आहे आणि हा पाठपुरावा समाजाला न्याय देण्यासाठी सरकारजवळ भरपूर आहे असा संघटनेला ठाम विश्वास आहे.त्याचप्रमाणे अनेक वर्तमानपत्रांच्या माध्यमातून कलाल-कलार समाजाच्या समस्या महाराष्ट्र सरकारपुढे पोहचविण्यात आल्या. कारण सत्य परिस्थिती राज्याच्या जनतेपुढे व सरकारपुढे मांडने हे समाजाचे प्रथम कर्तव्य आहे असे समाजाचे ध्येय आहे. आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात संबंधित खात्याचे मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी अनेकदा चर्चा सुध्दा झाल्यात प्रत्येक मंत्री महोदयांनी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचे आम्हाला ठोस आश्वासन सुध्दा दिले. परंतु आता अशी परिस्थिती ''घी काय मे गया तो खिचडी मे'' अशी गंभीर स्थिती सरकारने करून ठेवली आहे. आज चार ते पाच वर्षांचा काळ लोटत आहे तरीही सरकारला समाजाच्या समस्यांबद्दल अजुनपर्यंत जाग आल्याचे दिसत नाही हे महाराष्ट्राचे व लोकशाहीचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.राज्यात असेही अनेक समाज आहे की ज्या समाजाने कोणतेही आंदोलन केले नाही किंवा संघर्ष केला नाही अशाही समाजाला सरकारने आर्थिक विकास महामंडळ जाहीर केले व त्यांचे कार्य सुरू झाले आहे याचेही महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना स्वागत करते. कारण कोणताही समाज असो तो विकासाच्या प्रवाहात यायलाच हवा असे आमचे स्पष्ट ध्येय आहे.महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या अल्पशा मागण्या सरकार दरबारी आहेत आणि त्याबद्दल ठोस पाठपुरावे सुध्दा केले आहेत.याच अनुषंगाने समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी व समाजाच्या युवकांना रोजगार मिळावा व समाजाचा विकास व्हावा यासाठी ''भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ'' स्थापन करण्यात यावे आणि विश्वकर्मा योजने अंतर्गत समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय समाजाला देण्यात यावा इत्यादी समाज हिताच्या मागण्यांच्या संदर्भात सतत संघर्ष व पाठपुरावे सुरूच आहे आणि सुरूच राहील.या पत्राद्वारे सरकारला पुन्हा आश्वस्त करण्यात येते की,समाजाच्या प्रती''महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेचा'' पाठपुरावा, संघर्ष,आंदोलन, वेळोवेळी दिलेले निवेदन, पत्रव्यवहार आणि समाजावर होत असलेला अन्याय या संपूर्ण बाबींचा सरकारने, संबंधित मंत्रीमहोदय, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रशासन यांनी गांभीर्याने विचार करावा व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात ठोस निर्णय घेऊन ''भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ'' स्थापन करावे व समाजाला योग्य न्याय मिळवून द्यावा अशी आग्रहाची मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटने मार्फत सरकारला व संबंधित मंत्रीमहोदयांना करण्यात येत आहे. अन्यथा आम्हाला पुन्हा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल.करीता सरकारला पुन्हा आश्वस्त करण्यात येते समाजाचा अंत न पहाता सरकारने समाजाचे गांभीर्य लक्षात घेऊन समाजाच्या मागण्यांनवर सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात तातडीने ठोस निर्णय घ्यावा व समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे.अशी मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने सरकारला करण्यात येत आहे. जय कलार!जय हिंद.



**रमेश लांजेवार**
**( राज्य प्रवक्ता )**
**महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना,**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# हल्ली गाड्या शिस्तीत चालवणे काळाची गरज!

साधारण पाच-दहा वर्षांपूर्वी रोडवर वाहनांची संख्या आणि गाड्यांची वर्दळ खूपच कमी प्रमाणात होती. लोकांकडे आजच्या एवढी लहान-मोठी वाहने नव्हती. फार क्वचित लोकांकडे गाड्या पहावयास मिळायच्या. बहुतांश लोक गावखेड्याला किंवा शहरी भागात जायचे झाल्यास सर्रासपणे महामंडळ बसचा म्हणजेच लालपरीचा वापर करायचे. तेव्हा फार कमी लोकांकडे दुचाकी व चारचाकी गाड्या असायच्या. आणि ज्यांच्याकडे गाड्या आहेत, त्या माणसांना खूप मोठा व श्रीमंत व्यक्ती समजले जायचे.

एकेकाळी दुचाकी व चारचाकी वाहने खूप कमी होती. लोक एसटीने किंवा प्रवासी गाड्यांनी भ्रमंती करायचे. तेव्हा रोडवर देखील वाहनांची रहदारी आणि वर्दळ खूपच कमी असायची. आणि ड्रायव्हर सुद्धा निर्व्यसनी, प्रशिक्षित व शिस्तप्रिय असायचे. मद्य प्राशन करून सुसाट वेगाने ते गाड्या कधीच चालवत नव्हते. गाडी नियमांचे व रोड नियमांचे पालन करूनच ते गाड्या शिस्तीने व सावकाशपणे चालवायचे. कोणताच ड्रायव्हर शिस्त सोडून मस्तवालपणे गाडी चालवताना दिसायचा नाही. दोन्ही डोळ्यात पूर्ण तेल ओतून आणि मनात थोडी भीती बाळगून ड्रायव्हर उत्कृष्टपणे व सफाईदारपणे गाडी चालवायचे. त्याकाळी गाडी अपघातांचे प्रमाण देखील खूप कमी होते. कारण तेव्हाचे ड्रायव्हर शिस्तप्रिय, प्रशिक्षित आणि निर्व्यसनी होते. आपल्या हातून कोणतीच जीवित हानी होणार नाही याची दक्षता घ्यायचे.

परंतु हल्ली ड्रायव्हर लोकांनी स्वतःच्या हातानेच स्वतःची प्रतिमा मलीन करून टाकली आहे. म्हणूनच तर ड्रायव्हर बंधूंकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलून गेला आहे.

ड्रायव्हर म्हणजे शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर फेकला गेलेला आणि व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकलेला व्यसनाधीन माणूस म्हणजे आताचा चालक किंवा ड्रायव्हर होय. अशी लोकांची मानसिकता बनली आहे. मद्यपान केल्याशिवाय गाड्या न चालवणारे ड्रायव्हर हल्ली अगदी बोटावर मोजण्याइतकेच शिल्लक आहेत. म्हणूनच की काय? आता गाडी अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. आतापर्यंत गाडी अपघातात एकूण मृत्यू पावणाऱ्यांपैकी व्यसनाधीन तरुणांचे प्रमाण त्यात अधिक आहे. आता घरोघरी गाड्या झाल्या आहेत, आणि ज्या घरात एकही गाडी नाही आणि एकही ड्रायव्हर नाही असे घर माझ्या मते शोधूनही सापडणार नाही. अगदी दहा-बारा वर्षे वयोगटातील लहान मुले सुद्धा मस्तवालपणे दुचाकी व चारचाकी वाहने भरधाव वेगाने चालवत आहेत. कोणताच मागचा पुढचा विचार न करता बेदरकारपणे आणि सुसाट वेगाने गाड्या पळवत आहेत. गाड्या शिस्तीत चालवायच्या सोडून मस्तीत चालवत आहेत. दारू ढोसून गाड्या चालवणे आताच्या ड्रायव्हरची जणू फॅशनच बनली आहे. म्हणून बहुतांश ड्रायव्हर दारू प्राशन करूनच गाडीची चाके फिरवतात. देशात सर्वाधिक मृत्यू हे गाडी अपघाताने होतात, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. यात व्यसनाधीन, मस्तवाल, अज्ञानी, विदाऊट लायसन्स आणि अविवेकी ड्रायव्हरमुळे निर्व्यसनी, निष्पाप व निरागस लोकांना नाहक अपघाताला सामोरे जाऊन मृत्युमुखी पडावे लागत आहे. ज्यांना गाडीवर कंट्रोल नाही, ज्यांना गाडीची परिपूर्ण माहिती नाही, असे ड्रायव्हर सुद्धा स्वतःच्या आणि दुसऱ्यांच्या जीवाची जराही पर्वा न करता बेफिकिर व मस्तवालपणे वायू वेगात गाड्या चालवत आहेत. सध्या जगाच्या पाठीवर वाहनांची संख्या अमाप झाली आहे. जिकडे बघावे तिकडे नुसत्या गाड्याचगाड्या दिसताहेत. रस्ते सुद्धा खाचखळग्यांचे व अरुंद असल्यामुळे आणि रस्त्यावर गाड्यांची वाहतूक प्रचंड असल्यामुळे ड्रायव्हर बंधूंनी वाहने सावकाश, नियमबद्ध व शिस्तबद्ध चालवणे काळाची गरज बनली आहे. परंतु ड्रायव्हर मद्यपान करून, बेशिस्त, बेफिकिर, स्वतःचा गाडीवर ताबा नसल्यामुळे आणि गाडीचा वेग सुसाट असल्यामुळे गाड्यांचा अपघात होऊन जीवित हानी होणे ही नटळणारी बाब आहे. आताची युवा पिढी वाहनांना जरा हलक्यात घेत आहे. वाहने म्हणजे त्यांना लहान मुलांचे खेळणे वाटत आहे. म्हणून त्यांना गाड्या चालवण्याची जराही भीती वाटत नाही. म्हणून ते मद्यधुंद अवस्थेत कसेही मनमानी व मस्तवालपणे वाहने चालवून स्वतःच्या व दुसऱ्यांच्या जीवाला हानी पोहोचवत आहेत. प्रशासनाने प्रशिक्षित, परवानाधारक, निर्व्यसनी आणि प्रौढ चालकांनाच रोडवर गाड्या चालवण्याची मुभा द्यावी. आणि जे ड्रायव्हर रोड नियमांचे काटेकोरपणे पालन करत नाहीत आणि मद्यधुंद अवस्थेत गाड्या चालवतात अशा चालकांना योग्य तो दंड ठोठावून प्रसंगी त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. तरच रोड अपघातात मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण कमी होईल. अशा व्यसनी व नालायक ड्रायव्हरमुळे चांगल्या व प्रशिक्षित चालकांना वाहने चालवण्यास खूप भीती वाटत आहे. हल्ली रोडच्या कडेने पायी चालत जाणे सुद्धा चांगल्या लोकांसाठी धोकादायक बाब बनली आहे. कोण, कुठून व कसा येईल? आणि आपल्याला कधी वर घेऊन जाईल? हे कोणालाच सांगता येत नाही. म्हणून प्रत्येकाने गाड्या चालवताना अतिशय शिस्तीने, सावकाश आणि रोड नियमांचे पालन करूनच दक्षतेने व काळजीपूर्वक वाहने चालवावीत. विशेष बाब म्हणजे चालकांनी केवळ गाड्या चालवताना तरी दारू प्राशन करू नये. आणि जनतेला सुद्धा माझी नम्र विनंती आहे की, रस्त्याने पायी चालताना, गाडी चालवताना किंवा रस्ता क्रॉस करताना अतिशय शिस्तीने आणि दक्षतेने वाटचाल करावी. शिस्तीला आणि नियमांना पायदळी तुडवून मस्तवालपणे व बेदरकारपणे गाड्या चालवत असाल तर ड्रायव्हर बंधूंनो, वेळीच सावधान..!

पुढे धोका आहे, वाहने सावकाश चालवा.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## पान १ व ४ वरुन...

### जालना नगरी...

होते. रिंगण सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांच्या मुखातून अखंड हरिनामाचा गजर सुरू होता. टाळ, मृदुंग, वीणा आणि भजन-कीर्तनाच्या सुरांनी संपूर्ण मैदान भक्तिमय वातावरणाने भारावून गेले. मुक्ताई माऊलींच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी आणि रिंगण सोहळ्याचा दिव्य अनुभव घेण्यासाठी जालना शहरासह परिसरातील हजारो भाविकांनी गर्दी केली होती.

सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक संस्थेने उत्कृष्ट नियोजन केले होते. भाविकांसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा, बसण्याची व्यवस्था, वाहतूक नियोजन तसेच सुरक्षा व्यवस्थेची विशेष काळजी घेण्यात आली होती. पोलीस प्रशासन, महानगरपालिका आणि विविध स्वयंसेवी संस्थांनीही आपापली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

उपस्थित मान्यवरांनी संत मुक्ताबाई यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत समाजात प्रेम, समता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश अधिक व्यापकपणे पोहोचविण्याचे आवाहन केले. संतांची शिकवण ही आजच्या समाजासाठीही तितकीच प्रेरणादायी असून वारी परंपरा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभवाचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

भक्ती, श्रद्धा, शिस्त आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम घडवून आणणारा हा भव्य रिंगण सोहळा जालनेकरांच्या स्मरणात कायम राहील, अशा भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केल्या.

### महानगरपालिकेच्या...

महानगरपालिकेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे आणि उपलब्ध सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर विशेष भर देण्यात आला. शिक्षक व मुख्याध्यापकांनीही विविध सूचना मांडत शाळांच्या विकासासाठी सहकार्याची भूमिका व्यक्त केली.

### रोहिणा पुलावर...

सात्विक पळसकर (०७),चैताली पळसकर (१०),दिपक पळसकर (३५),दिक्षा पळसकर, हे सर्व रा. डोणगाव ता. मेहकर जि. बुलडाणा) माधव वानखेडे, वैभव शिंगणे, रा. देऊळगाव मही ता. देऊळगाव राजा हे किरकोळ जखमी झाले.जखमीवर परतूर येथील ग्रामीण रुग्णालयाय उपचार करण्यात आले.

अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत बसमधील जखमी प्रवाशांना बाहेर काढले. पोलिस, रुग्णवाहिका आणि आपत्कालीन यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून जखमींना परतूर, मंठा आणि वाटूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### जालना ते लंडन...

बल्गेरिया, सर्बिया, क्रोएशिया, हंगेरी, स्लोव्हाकिया, झेकिया, जर्मनी, नेदरलँड्स, बेल्जियम आणि फ्रान्स असा प्रवास करत त्यांनी १९ जून रोजी लंडन गाठले. या प्रवासादरम्यान विविध देशांतील भाषा, हवामान, सीमाशुल्क प्रक्रिया आणि वाहतूक नियमांचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला. चीनमध्ये उजव्या बाजूने वाहन चालविण्याच्या पद्धतीमुळे काही आव्हाने निर्माण झाली होती. मात्र आत्मविश्वास आणि अनुभवाच्या बळावर त्यांनी ती यशस्वीपणे पार केली. तसेच सौ. सोनी बजाज यांनी सुमारे २,००० किलोमीटर वाहन चालवत या मोहिमेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. यावेळी भास्कर आबा दानवे यांनी बजाज दाम्पत्याचे अभिनंदन करत, ''जालना शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिमानाने पोहोचविणारे हे यश संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे. त्यांच्या जिद्द, नियोजन आणि चिकाटीमुळे अनेक युवकांना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळेल,'' असे सांगितले.

### श्रीसंत मुक्ताबाई पंढरपूर....

चिकित्सक डॉ राजेंद्र पाटील,जिल्हा आरोग्य अधिकारी श्रीमती डॉ जयश्री भुसारे , खासदार मा श्री कल्याणजी काळे,माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा माजी खासदार रावसाहेब दानवे,आमदार मा श्री अर्जुनभाऊ खोतकर, आमदार मा श्री नारायण कुचे साहेब, आमदार मा श्री बबनराव लोणीकर साहेब, आमदार मा श्री हिकमत दादा उढाण, आमदार मा श्री संतोषभाऊ दानवे,माजी आमदार कैलास सेठ गोरंट्याल, महापौर श्रीमती वंदनाताई मगरे , उपमहापौर श्री राजेश राऊत , नगरसेवक बाप्पू साळवे, नगरसेवक दीपक राठोड, नगरसेवक योगेश भगत तसेच भाजप जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांचा समावेश होता. उपस्थित मान्यवरांनी वारकरी सेवेसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे अभिनंदन करत अशा सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना, गुरूमिश्री होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शेलगाव, विठ्ठल-रुक्मिणी संस्थानचे पदाधिकारी, डॉक्टर, प्राध्यापक, विद्यार्थी, स्वयंसेवक तसेच भाविक मंडळी यांचे उल्लेखनीय सहकार्य लाभले.

उपक्रमाचे प्रमुख समन्वयक डॉ. सोपान चव्हाण (वैद्यकीय अधिकारी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, जालना) यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय प्रभावीपणे सांभाळत सर्व संबंधितांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, वारकरी भाविकांना आरोग्यदायी आणि सुरक्षित वारीचा अनुभव मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. समाजहितासाठी अशा प्रकारचे सेवाभावी उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्यात येतील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. वारकरी परंपरेतील निःस्वार्थ सेवा, सामाजिक बांधिलकी आणि आरोग्यसेवेचा संगम घडवून आणणारा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरला. भाविकांनी आयोजकांनी दिलेल्या सेवेमुळे समाधान व्यक्त करत अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

### जालना व बदनापुर...

शिक्षक उत्कर्ष पॅनल चे प्रमुख श्री.मंगेश जैवाळ श्री. बाबासाहेब जुंबड, श्री. रमेश हुशे, श्रीमती सिमा काकडे यांनी अभिनंदन करताना पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी श्री बाबुरावजी पवार श्री. अरुण जाधव, श्री. बबनराव बोरुडे,श्री.जगत घुगे, श्रीमती साधना जैवाळ व श्री.ईश्वर गाडेकर, श्री. प्रमोद पवार यावेळी विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

### बालस्नेही महाराष्ट्रसाठी...

म्हणून जिल्हाधिकाऱ्यांवर बाल संरक्षण व्यवस्थेवर देखरेख ठेवण्याची कायदेशीर जबाबदारी आहे. त्याच अनुषंगाने आयोगाने हा व्यापक आढावा घेण्याचा निर्णय घेतला असून, आवश्यक सुधारणा आणि शिफारशींसह अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आयोगाने स्पष्ट केले आहे की, प्राप्त होणाऱ्या अहवालांचे बारकाईने परीक्षण केले जाईल. आवश्यकतेनुसार संबंधित जिल्ह्यांना प्रत्यक्ष भेटी देण्यात येतील, संस्थांची पाहणी केली जाईल, सुनावण्या घेतल्या जातील आणि त्यानंतर राज्य शासनाकडे आवश्यक शिफारशी सादर करण्यात येतील. निर्धारित मुदतीत अहवाल न सादर करणाऱ्या जिल्ह्यांविरुद्ध उपलब्ध नोंदींच्या आधारे पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही आयोगाने दिला आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने ३ जुलै २०२६ रोजी आणखी एका आदेशाद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तसेच उपजिल्हाधिकारी (नगर प्रशासन) यांना नगर बाल संरक्षण समित्यांबाबतचा स्वतंत्र अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. महिला व बाल विकास विभागाच्या १० जून २०१४ च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक नगर परिषद आणि नगरपालिकेमध्ये नगर बाल संरक्षण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. या समित्यांच्या माध्यमातून बालकांवरील अत्याचार, शोषण, दुर्लक्ष, बालमजुरी, बालविवाह, बाल तस्करी यांसारख्या गंभीर समस्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे तसेच विविध विभागांमध्ये समन्वय साधणे अपेक्षित आहे. आयोगाने संबंधित प्रशासनाला समित्या स्थापन झाल्या असल्यास त्याबाबतचा शासन आदेश, विद्यमान सदस्यांची यादी आणि समितीच्या कामकाजाचा संक्षिप्त अहवाल आयोगाकडे पाठविण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या ठिकाणी अद्याप समित्यांची स्थापना झालेली नाही, तेथे शासन निर्णयानुसार तातडीने समित्या स्थापन करून त्याचा अनुपालन अहवाल, स्थापनेचा आदेश आणि सदस्यांची यादी आयोगाकडे पाठविणे बंधनकारक करण्यात आले आहे. पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सर्व माहिती आयोगाकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील बाल संरक्षण व्यवस्था अधिक सक्षम, उत्तरदायी आणि परिणामकारक करण्यासाठी आयोगाने हाती घेतलेली ही राज्यव्यापी मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, यामुळे प्रत्येक जिल्ह्यातील बाल संरक्षण यंत्रणेची प्रत्यक्ष स्थिती समोर येणार आहे. तसेच उणिवा दूर करून महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने बालस्नेही महाराष्ट्र बनविण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

### शांती कुंज विषबाधा...

संस्थेतील एकूण कार्यपद्धतीचीही तपासणी करण्याची आवश्यकता आयोगाने व्यक्त केली आहे.

सुनावणीनंतर आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना पुढील बाबींची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये विषबाधा प्रकरणाची सर्वंकष चौकशी करावी तसेच मुलींना देण्यात आलेल्या अन्नाच्या दर्जाची आणि नमुन्यांची तपासणी करून पीडित मुलींचे वैद्यकीय अहवाल आणि उपचारांचा संपूर्ण तपशील सादर करण्यात यावा. संबंधित अधिकारी, कर्मचारी किंवा अन्य जबाबदार व्यक्तींची जबाबदारी निश्चित करून आवश्यक कारवाई करण्यात यावी. संस्थेतील सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, निवास, पोषण, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांचे विशेष लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे.

आयोगाने या संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर चौकशी अहवाल आणि करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्व आवश्यक कागदपत्रांसह सात दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या अहवालानंतर आयोग पुढील कारवाईचा निर्णय घेणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे शासकीय संरक्षणगृहांमधील बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, आयोगाच्या हस्तक्षेपामुळे या घटनेतील वस्तुस्थिती समोर येण्याबरोबरच दोषींवर जबाबदारी निश्चित होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### अल्पसंख्यांकांच्या...

इतर ठिकाणी जावे लागत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.अल्पसंख्याक वस्त्यांमध्ये रस्ते, पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, पथदिवे यांसारखी मूलभूत विकासकामे रखडल्याची बाबही आयोगाच्या अध्यक्षांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. या वस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना व शासन निर्णयांची माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत नसल्यामुळे अनेक पात्र लाभार्थी योजनांपासून वंचित राहत असल्याचे सांगत प्रभावी जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता शिष्टमंडळाने व्यक्त केली. तसेच परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, आर्थिक सहाय्य व आवश्यक सुविधा जिल्हास्तरावर उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली. उद्योग क्षेत्रातील समस्यांबाबत बोलताना जिल्हा उद्योग केंद्रात उद्योग कर्जाची प्रकरणे स्वीकारताना अनावश्यक कागदपत्रांची अट घालण्यात येते, तर बँकांकडूनही विविध कारणे सांगून कर्ज मंजुरीत टाळाटाळ केली जाते, अशी तक्रार करण्यात आली.

उद्योग उभारणीसाठी आवश्यक असलेल्या रकमेऐवजी अत्यल्प कर्ज मंजूर होत असल्याने तरुण उद्योजक अडचणीत येत असल्याचे शिष्टमंडळाने सांगितले. राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी शिष्टमंडळाने मांडलेल्या सर्व समस्या गांभीर्याने ऐकून घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. जालना जिल्ह्यातील प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी लवकरच जालना जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करून सकारात्मक तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

# कर्जमुक्तीकडून आत्मनिर्भरतेकडे... बळीराजासाठी नवी आशा

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय संस्कृती ही विविधतेने नटलेली आहे. भारतात जवळपास २२ प्रमुख भाषा व ७२० बोली बोलल्या जातात. भारतात अनेक तऱ्हेचे व्यवसाय केले जातात. पण शेती हा भारतातील प्रमुख व्यवसाय आहे. म्हणुनच भारताला 'कृषी प्रधान देश म्हणुन सुध्दा ओळखले जाते.' शेतकरी भारताचा कणा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत त्याचे १७ टक्के योगदान आहे. शेतकऱ्यांमुळेच भारत आज अन्नाच्या बाबतीत आत्मनिर्भर आहे. याशिवाय दरवर्षी खूप सार खाद्यान्न भारतातून इतर देशांना निर्यात केले जाते. ''जय जवान, जय किसान'' या विचाराचा खरा अर्थ साकार करणारा अन्नदाता शेतकरी देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. स्वतःच्या कष्टाने तो संपूर्ण समाजाचे अन्नसुरक्षेचे दायित्व सांभाळतो. मात्र, निसर्गाची अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार आणि आर्थिक संकटांमुळे अनेक शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले जातात. अशा परिस्थितीत महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही लाखो शेतकरी कुटुंबांसाठी दिलासादायक ठरणार आहे. यंदा १ जुलै कृषी दिन, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ही योजना प्रत्यक्षात राबविण्यास सुरुवात होत आहे. कृषी विकासासाठी त्यांनी दिलेल्या दूरदृष्टीपूर्ण योगदानाला ही योजना एक प्रकारे अभिवादन करणारी ठरेल. या योजनेअंतर्गत जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास प्रारंभ होणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, नव्या उत्साहाने शेती करण्याचा आत्मविश्वास निर्माण होईल. योजनेनुसार पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची कर्जमुक्ती देण्यात येणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (ओटीएस) योजना राबविण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाकडून प्रोत्साहन मिळणार आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया आधार क्रमांकावर आधारित आणि ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. महाआयटीच्या माध्यमातून लाभार्थ्यांची संगणकीय पडताळणी करण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, संबंधित बँका, आपले सरकार सेवा केंद्र तसेच गाव चावडीवर प्रसिद्ध केल्या जातील. मोबाईल संदेशाद्वारे लाभार्थ्यांना माहिती देण्याची व्यवस्था करण्यात आल्याने पारदर्शकता आणि सुलभता अधिक वाढणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी वेळेत आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे. ओटीएस योजनेतील लाभार्थ्यांनी शासनाचा लाभ मिळण्यापूर्वी स्वतःचा हिस्सा जमा करणे बंधनकारक राहील. तसेच अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नाही. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा बँकांकडून पीककर्ज घेऊ शकतो, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करू शकतो, सिंचन व यांत्रिकीकरणासाठी गुंतवणूक करू शकतो.

त्यामुळे कृषी उत्पादन वाढण्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही नवसंजीवनी मिळणार आहे.शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला तर शेती सक्षम होईल आणि शेती सक्षम झाली तर राज्य व देशाची अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना२०२६ ही केवळ कर्जमुक्तीची योजना नसून, बळीराजाला आत्मनिर्भरतेकडे नेणारे आणि ग्रामीण विकासाला नवी दिशा देणारे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

**-जिल्हा माहिती कार्यालय, जालना**

# ३७ वर्षांत क्वचितच घेतली रजा; शिक्षक मोहम्मद इसहाक सेवानिवृत्त

**जालना - प्रतिनिधी**

शिक्षक म्हणून तब्बल ३७ वर्षे समर्पित सेवा बजावल्यानंतर मोहम्मद इसहाक हे उर्दू हायस्कूल, जालना येथून सेवानिवृत्त झाले. आपल्या संपूर्ण सेवाकाळात ते आदर्श उपस्थितीसाठी ओळखले जात होते. त्यांनी किरकोळ प्रसंग वगळता क्वचितच कॅज्युअल लीव्ह (सीएल) घेतली आणि अर्जित रजा (ईएल) तर जवळपास कधीच घेतली नाही.



विशेषतः माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय आनंददायी आणि प्रभावी पद्धतीने शिकविण्याच्या त्यांच्या शैलीमुळे अनेक पिढ्यांतील विद्यार्थी त्यांना आदराने स्मरतात. त्यांचा प्रेमळ, जिव्हाळ्याचा आणि विद्यार्थीप्रिय स्वभाव त्यांना शाळेतील सर्वाधिक लोकप्रिय शिक्षकांपैकी एक बनवत होता. त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेबद्दलची आवड निर्माण केली.

सहकारी शिक्षकांनी त्यांच्या संपूर्ण सेवाकाळातील शिस्त, वक्तशीरपणा आणि प्रामाणिकपणाचे कौतुक केले. शाळेच्या नोंदीनुसार, इशाक यांनी वर्षातून केवळ एक-दोन दिवसच कॅज्युअल रजा घेतली आणि तीही केवळ आपत्कालीन परिस्थितीत. ३७ वर्षांच्या सेवेत त्यांनी अर्जित रजा जवळपास घेतलीच नाही. त्यांची उल्लेखनीय उपस्थिती ही त्यांच्या व्यवसायावरील अपार निष्ठा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या जबाबदारीची साक्ष देणारी ठरली.

शाळा व्यवस्थापनातर्फे त्यांच्या सन्मानार्थ निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष मोहम्मद झुल्फेकरुद्दीन, सचिव मोहम्मद इफ्तेखारुद्दीन, मुख्याध्यापक शेख नबील तसेच इतर शिक्षकांनी इशाक यांच्या अध्यापनातील समर्पण आणि आदर्श सेवाभावाचे कौतुक केले. त्यांच्या निरोगी, आनंदी आणि समाधानकारक निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा देत संस्थेच्या आणि हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील त्यांच्या अमूल्य योगदानाचा गौरव करण्यात आला.

# शिवसेनेच्या वतीने रामरक्षा स्तोत्र पठण व श्री रामप्रभुची आरती



**जालना - प्रतिनिधी**

अयोध्येतील राम मंदिराच्या दानपेटीत झालेल्या लुटीच्या निषेधार्थ शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जालना शहरातील मस्तगड येथील राममंदिरात रविवार ५ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता प्रभु श्रीरामाची आरती करण्यात आली. तसेच रामरक्षा स्तोत्र हनुमान चालीसा म्हणत आशिर्वाद घेतले. शिवसेना शहरप्रमुख दीपक रणनवरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन

करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेंद्र जाधव, मंदिर व्यवस्थापक अशोकराव बल्लाळ, संदीप झारकंडे, शिवसेना उपशहरप्रमुख संतोष क्षत्रिय, मीरा संतोष क्षत्रिय यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी रघुनाथ खरात, पोपटराव सोनवणे, योगेश केने, वरद कुलकर्णी, विवेक मोहिते, जयेश क्षत्रिय, रमेश सलामपुरे, यश गायकवाड, सुलोचना सोळुंके, ममता देवरे,

अनन्या देवरे,संध्या बल्लाळ, दगडाबाई तिलवार, शोभा दहिवाल, संगिता कदम,

नरेंद्र रणनवरे आदींची उपस्थिती होती.

# भारतातही फुटबॉल संस्कृती रुजायला हवी!

फुटबॉल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जातो. जगातील जवळपास प्रत्येक देशात हा खेळ खेळला जात असल्याने त्याला खेळांचा राजा असेही म्हटले जाते. या खेळाचा सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा म्हणजे फिफा विश्वचषक. फुटबॉलप्रेमींसाठी हा स्पर्धा महोत्सव म्हणजे अक्षरशः कुंभमेळाच. यंदाचा २०२६ चा विश्वचषक अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांनी संयुक्तपणे आयोजित केला असून प्रथमच ४८ संघांच्या सहभागामुळे स्पर्धेचे स्वरूप अधिक व्यापक आणि रोमांचक झाले आहे. यापूर्वी विश्वचषकात ३२ संघ सहभागी होत असत. मात्र यंदापासून ४८ संघांचा समावेश करण्यात आला आहे. १२ गटांमध्ये विभागलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटातील अव्वल दोन संघांसह सर्वोत्तम आठ तिसऱ्या क्रमांकाच्या संघांनाही बाद फेरीत प्रवेश मिळत आहे. त्यामुळे अधिक देशांना जागतिक स्तरावर स्वतःचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली आहे.

यंदाच्या विश्वचषकात अनेक धक्कादायक निकाल पाहायला मिळाले. बलाढ्य संघांना अनपेक्षित पराभव पत्करावा लागला, तर काही नवोदित संघांनी आपल्या खेळाने जगाला चकित केले. त्यापैकी सर्वाधिक चर्चेत राहिला तो आफ्रिकेतील छोटासा केप वर्दे देश. अवघी सुमारे सहा लाख लोकसंख्या असलेल्या या देशाने प्रथमच विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आणि बाद फेरीपर्यंत मजल मारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अर्जेंटिनाविरुद्ध अखेरच्या क्षणी गोल स्वीकारल्यामुळे त्यांचा प्रवास थांबला; पण त्यांनी फुटबॉलप्रेमींची मने जिंकली. आकाराने लहान असला तरी जिद्द, शिस्त आणि सांघिक खेळाच्या बळावर जगात स्वतःचे स्थान निर्माण करता येते, हे केप वर्देने सिद्ध करून दाखवले.

एका बाजूला केप वर्देसारखा छोटा देश जागतिक फुटबॉलमध्ये उल्लेखनीय कामगिरी करतो, तर दुसऱ्या बाजूला तब्बल १४५ कोटी लोकसंख्या असलेला भारत अजूनही विश्वचषकापासून दूर आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाला जागतिक फुटबॉलमध्ये ठोस स्थान निर्माण करता आलेले नाही, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. प्रतिभेची कमतरता नसतानाही नियोजन, पायाभूत सुविधा, प्रशिक्षण व्यवस्था आणि तळागाळातील विकास यामध्ये आपण मागे पडत आहोत.

भारतात क्रिकेटला मिळणारी लोकप्रियता आणि सुविधा इतर खेळांना मिळत नाहीत, हे वास्तव आहे. फुटबॉलची परंपरा पश्चिम बंगाल, केरळ, गोवा आणि ईशान्येकडील काही राज्यांपुरतीच मर्यादित राहिली आहे. अनेक ठिकाणी दर्जेदार मैदाने, प्रशिक्षक, प्रशिक्षण केंद्रे आणि स्पर्धांचा अभाव आहे. त्यामुळे अनेक गुणवान खेळाडूंना स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधीच मिळत नाही.

भारतात फुटबॉल संस्कृती रुजवायची असेल तर केवळ व्यावसायिक लीग पुरेशा ठरणार नाहीत. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर फुटबॉलला प्रोत्साहन देणे, प्रत्येक जिल्ह्यात दर्जेदार मैदाने उभारणे, प्रशिक्षित प्रशिक्षक उपलब्ध करून देणे, नियमित स्पर्धांचे आयोजन करणे आणि ग्रामीण भागातील प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळवून देणे आवश्यक आहे.

माध्यमांनीही फुटबॉलला अधिक प्रसिद्धी दिल्यास आणि आंतरराष्ट्रीय सामन्यांचे व्यापक प्रक्षेपण झाल्यास तरुण पिढी या खेळाकडे अधिक आकर्षित होईल.

भारताकडे प्रतिभा, युवा शक्ती आणि संसाधनांची कमतरता नाही. गरज आहे ती दीर्घकालीन नियोजनाची, सातत्यपूर्ण गुंतवणुकीची आणि फुटबॉलला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची. क्रिकेटप्रमाणेच फुटबॉललाही देशभरात पोषक वातावरण निर्माण झाले, तर भारताचाही तिरंगा एक दिवस फिफा विश्वचषकाच्या मैदानावर अभिमानाने फडकताना पाहण्याचे स्वप्न निश्चितच साकार होऊ शकते.

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जि. पुणे**

# ह्या प्लास्टिकचे करायचे काय?

आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनात प्लास्टिक अविभाज्य अंग झाले आहे.अगदीच अनिर्बंध पणे आपण प्लास्टिकच्या पिशव्या आणि प्लास्टिकच्या इतरही वस्तूंचा सहज वापर करत असतो.

भाजीपाला, फळफळावळे,किराणा माल वस्तू, दूध, डेअरी आयटम,कपडा,हॉटेल्सवर,पावभाजी ठेल्यावर, कुल्फी -आयस्क्रीम गाड्यांवर,पुस्तकांचे दुकानात, फूट वेअर मध्ये, प्रवासात,प्लास्टिक पिशव्यांचा वापरही अगदी सहजपणे होत असतो.मग त्या पिशव्यांची जाडी ५०|७५ मायक्राँन आहे का? का त्या पेक्षाही कमी आहे हे पहायला कोणाला वेळ आहे.आजच्या गतिमान जीवनात त्या त्या वेळेची गरज भागतेय ना.बस्स.बाकी गोष्टींना वेळ नाही.असंच काहीसा झालयं.

घरगुती वस्तू वापरायचे बाबतीत तेच.फ्रीज मधल्या पाण्याचा बाँटल्स,भाजीपाला ठेवायला पिशव्या,प्लास्टिक कप,मग,यूज अँड थ्रोजचे ग्लास, घरगुती चटण्या,मिरच्या,तिखट,मिठ,मसालाअशा अनेक वस्तूं ठेवण्यासाठी प्लास्टिक बरण्यांचा वापर होत असतो.ह्या वस्तूंचे उपयोग अनेकविध असले तरी दुष्परिणामही तितकेच आहे.फ्रीज मधल्या पाण्याच्या बाँटल्स किती दिवस वापराव्यात,वेगवेगळ्या ठिकाणी प्रवासात घेतलेल्या पाण्याचा बाँटल्स केव्हा पर्यंत वापराव्या, त्याचा परतवापर करावा का ? ह्याचा आपण काही विचारच करत नाही. आणि त्याचे ज्ञानही अनेकांना नसते.त्यामुळे एका विशिष्ट काळा नंतर त्याचे दुष्परिणाम नकळत आपल्या शरिरावर होत असतात.

घरा मधला कचरा प्लास्टिक पिशव्यातून कचरा गाड्यांत दिला जातो. उरलेले शिळे अन्नही पिशव्यातूनच गृहिणी टाकत असतात. अर्थातच त्यांनाही काही पर्याय नसतो. त्यांचा नाईलाज असतो.अनेक निरुपयोगी बाँटल्स,प्लास्टिक वस्तू, चहाचे युज अँन्ड थ्रो ग्लास, लग्न समारंभा नंतरच्या डीश,कचरा गाड्यांत दिल्या जातात.नगरपालिकांचे कचरा व्यवस्थापन योग्यरित्या होत असेल तर तो कचरा, कचरा डेपोवर टाकला जातो,अन्यथा गाव,शहराच्या बाहेरच रस्त्यांच्या कडेला दुतर्फा टाकला जातो.त्याच कचऱ्यातल्या प्लास्टिक पिशव्या हवेमुळे ईकडेतिकडे पसरतात. शिळ्याअन्नाच्या पिशव्या खाण्यासाठी, गाई-म्हशी, आदी गुरेढोरे तिथे जमतात. अन्नाबरोबरच ते पिशव्याही खातात. अशा पिशव्या खाण्यामुळे हज्जारो जनावरे मृत पावतात.पशुधन नष्ट होते. देवस्थानं, पर्यटनस्थळ, ही अशा कचऱ्याची ,मोठी ठिकाणं आहेत.ह्या ठिकाणी पर्यटक प्लास्टिक पिशव्या, बाटल्या नाल्यातच फेकून देतात.पर्यायाने नाले,गटारी तुंबतात,दुर्गंधी फैलावते.रोगराईला आमंत्रण असते.

अनेक मोठ्या शहरात कचराडेपो असतात.ते नावालाच. कारण तिथे कचऱ्यावर कचरा टाकला जातो. त्या कचऱ्यात ६०ते७०टक्के प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, प्लास्टिक वस्तूच असतात.हा कचरा कधीच नष्ट होत नसतो. त्याच विघटन होत नसत. कारण प्लास्टिक पिशव्या नष्ट व्हायला खूप काळ जावा लागतो अस पर्यावरण तज्ञांचे ठाम मत आहे.त्याला नष्ट करणे हा एकच उपाय आहे.त्यामुळे परत वापरात न येणाऱ्या प्लास्टिकचे काय करावे? कुठे टाकावे फार मोठा गंभीर प्रश्न आपल्या देशात निर्माण झाला आहे.

प्रवास करतांना आपण पहातो, शहराच्या बाहेर रस्त्याच्या दुतर्फा कसा कचरा पडला असतो. त्यात बहुतांशी प्लास्टिक पिशव्या, बाटल्यांचा खच असतो. पुणे, पिंप्री चिंचवड,मुंबई ,ठाणे,नासिक, नागपूर, औरंगाबाद,जळगांव, ह्या मोठ्या शहरासह अनेक जिल्ह्यात,ग्रामीण भागातही ही समस्या मोठया प्रमाणात भेडसावू लागली आहे.शहरी भागातला कचरा ग्रामीण भागाचे हद्दीत टाकला गेल्यामुळे अनेक आंदोलनही झालीत.अगदी मुख्यमंत्र्यांना त्यासाठी मध्यस्थी करावी लागली आहे. ह्या समस्येची तीव्रता त्यांनाही माहिती आहे.

शासनाने ५० मायक्राँन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यावर बंदी आणली. तसा कार्यक्रमही काही दिवस राबवला गेला. पुणे , मुंबई, ठाणे, पिंप्रीचिंचवड भागात काही हजार क्विंटल माल जप्त केला, लाखांनी दंड वसूल झाला. ग्रामिण भागातही काही प्रमाणात कार्यक्रम राबवला.पण तरीही आज बाजार पेठेत प्लास्टिक पिशव्यांचा वापर सर्रास सुरु आहे. पिशव्यांसाठी किंमत आकारुनही आपण त्या घेतो, कारण पर्यायी कागदी, कापडी पिशव्या बऱ्याच महाग पडतात, असे ग्राहकांचे म्हणणे आहे.काही अंशी ग्राहक म्हणजे आपणच त्याला कारणीभूत आहोत. जी परिस्थिती शहरी भागात तीच ग्रामीण भागात दिसून येते. रस्त्यारस्त्यावर पिशव्या,चहाचे ग्लास, गुठखा पुड्या, वापरलेल्या सलाईनच्या बाटल्या, दिसून येतात..दवाखाने,व्यापारी पेठेत हे दृष्य हमखास दिसतेच. ठरवून दिलेले नियम पाळले जात नाही.




आज देशात प्लास्टिक निर्मितीचा उद्योग धंदा खूप पसरला आहे.किमान ३० ते ४० हजारावर युनिट असावे असा अंदाज आहे, त्यातून लाखो लोकांना रोजगार मिळतो. असे असले तरी -

* देशभरातील सिंगल युज ऑफ प्लास्टिक वापस आळा बसण्यासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने एक महत्वपूर्ण निर्णय घोषित केला आहे त्यानुसार या निर्णयाची अंमलबजावणी सुरु झाली. सिंगलयूज प्लास्टिक वापर करणे उत्पादन करणे साठा करणे विक्री करणे यावर बंदी घालण्यात आली आहे

* प्लास्टिकच्या पिशव्यांचे जाडी ५० मायक्रोन होऊन वाढून ७५ मायक्रोन पर्यंत वाढवली आहे त्यानंतर ही जाडी १२० पर्यंत असणार आहे

* प्लास्टिकचे कप, ग्लास, सिगरेटच्या पाकिटावर असणारे प्लॅस्टिकचे आवरण, प्लास्टिकचे चमचे, केक कापण्यासाठी वापरात येणारे सुरी, चॉकलेट आणि आइस्क्रीम साठी वापरण्यात येणाऱ्या कांड्या, सजावटीसाठी वापरण्यात येणारे पाँलीस्ट्रीन, फुग्या साठी वापरात येणारा दांड्या, प्लास्टिकचे मिठाईचे डबे आदी वस्तूंचा समावेश आहे. कंपोस्टेबल प्लास्टिक यातून वगळण्यात आले आहे.

*शासनाने, ठरवून दिलेल्या मायक्राँन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या निर्मिती वर बंदी घालून, अभियान अधिक प्रभावीपणे, कडक कारवाई करुन राबवायला हवे.

*ग्रामपंचायत नगरपालिका, महानगरपालिका, पातळीवर या बाबतीत कडक कारवाई चे निर्देश द्यायला हवे.

*केवळ शासनाचीच ही जबाबदारी नाही,पण नागरिक जर बेजबाबदार पणे, नियमबाह्य अशा पिशव्यांचा वापर करत असतील तर त्याना कायद्याचा बडगा दोघांनाही अर्थातच पिशवी देणारा व घेणारा दोघांनाही हवा.

*शासनाने प्लास्टिक कचरा विघटनाचे संदर्भात अद्ययावत यंत्रणा उभी करायला हवी जेणे करुन हा कचरा वाढणार नाही.पर्यवरणाचा समतोल राखला जाईल. कचरा विघटनाची कार्य काही ठिकाणी सुरू आहे परंतु अधिक व्यापक प्रमाणावर ते व्हायला हवे तरच कचरा आटोक्यात येईल

*प्रसारममाध्यमे,स्वयंसेवी संस्था, शिक्षण संस्थातून ह्याचा प्रचार प्रसार व्हायला हवा.

*केलेला कायदा कसा राबवला जाईल, त्यासाठी तशी प्रत्येक टप्प्यावर प्रशासनातील कोणत्या अधिकाऱ्यांची काय जबाबदारी आहे,ते नक्की करायला हवे.आणि केली असेल तर अंमलबजावणी वर लक्ष ठेवायला हवे.

आणि औषध प्रशासन विभागाने ज्याप्रमाणें धडक कारवाई सुरू केली आहे तशाच प्रकारची कारवाई प्लास्टिकचा वापर, साठा याबाबतीत सुरू करावी.

अखेर प्रश्न हा आहे की सरकार नागिरकांचे आरोग्या विषयी किती संवेदनशील आहे ? किती काळजी आहे.

काही लाख कोटीचा महसूल मिळतो म्हणून, दारु मुळे अनेकांची जीवन बरबाद होते,संसार धुळीला मिळतात ह्या गोष्टी कडे डोळेझाक केलीच जाते ना? तीच बाब प्लास्टिक उद्योग धंद्याचे बाबतीत. लोकांचे आरोग्य बिघडणाऱ्या गोष्टी कडे दुर्लक्ष करायचे, नंतर आरोग्य शिबिरं राबवायची.दोन्हीही गोष्टींचा समतोल साधायला हवा.

शेवटी एकच महत्वाचे, नियमबाह्य मायक्राँन पेक्षा कमी जाडी प्लास्टिक पिशवी उत्पादन बंद,आणि ईतर प्लास्टिक विघटन करुन नष्ट करणे. हाच प्रभाची तोडगा आहे.तरच हे शक्य आहे,नाही तर हा कचरा वाढतच जाणार आहे... नियम कायदे हे तर केले जातात पण त्याची अंमलबजावणी होते का ? हाच महत्त्वाचा प्रश्न आहे . नाही तर हे प्रश्न कायम रहाणार आहेच...



ह्या प्लास्टिकच करायचं काय..???

**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगाव.**
**मो.नं.-८९९९५६६९१७**

# आजारी आईला रुग्णालयात आणले; वाहनचालकावर ₹१,५०० चा दंड

## डझनभर अन्य वाहने उभी असतानाही एकाच कारवर कारवाई?; निवडक अंमलबजावणीचा आरोप, चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पोस्ट ऑफिस रोडदरम्यान असलेल्या एका खासगी रुग्णालयासमोर आजारी आईला उपचारासाठी घेऊन आलेल्या एका चारचाकी वाहनचालकावर सदर बाजार पोलीस ठाण्यातील एका महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी ₹१,५०० चा दंड ठोठावल्याचा आरोप समोर आला आहे. या कारवाईनंतर संबंधित वाहनचालकाने पोलिसांच्या कारवाईच्या निकषांवर प्रश्न उपस्थित करत, ''रस्त्यावर त्याचवेळी डझनभर वाहने उभी असताना केवळ माझ्याच वाहनावर कारवाई का?'' असा सवाल उपस्थित केला आहे.


संबंधित युवकाच्या म्हणण्यानुसार, त्याची आई आजारी असल्याने तिला तातडीने उपचारासाठी खासगी रुग्णालयात आणण्यात आले होते. रुग्णालयासमोर काही वेळासाठी वाहन उभे करत असतानाच महिला पोलीस कर्मचारी म्हस्के यांनी वाहनावर कारवाई करत थेट ₹१,५०० दंडाची पावती दिली. आईची प्रकृती गंभीर असल्याने रुग्णालयात दाखल करणे अत्यावश्यक असल्याचे वारंवार सांगूनही त्याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले नाही, असा आरोप त्याने केला आहे.

**''इतर वाहनांना अभय, माझ्यावरच कारवाई''**

वाहनचालकाचा आरोप आहे की, संबंधित रुग्णालयासह परिसरातील एका अलिशान हॉटेलसमोर त्यावेळी रस्त्यावर अनेक चारचाकी वाहने उभी होती. मात्र, त्या वाहनांकडे दुर्लक्ष करून केवळ त्याच्या कारवरच कारवाई करण्यात आली. जर वाहतूक नियमांचे उल्लंघन झाले असेल, तर सर्व वाहनांवर समान पद्धतीने कारवाई होणे अपेक्षित होते. निवडक वाहनांवरच कारवाई होत असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीबाबत संशय निर्माण होत असल्याचे त्याने म्हटले.

**रुग्णालय परिसरात संवेदनशीलतेची गरज**

गंभीर अवस्थेतील रुग्णांना रुग्णालयात आणणाऱ्या नागरिकांशी प्रशासनाने अधिक



संवेदनशीलतेने वागण्याची गरज असल्याचे मतही संबंधित युवकाने व्यक्त केले. रुग्णालय परिसरात काही मिनिटांसाठी वाहन उभे राहणे ही अनेकदा उपचाराच्या तातडीमुळे निर्माण होणारी परिस्थिती असते. अशा वेळी नियमांची अंमलबजावणी करताना मानवी दृष्टिकोनही तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्याचे म्हणणे आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून चौकशीची मागणी**

या संपूर्ण घटनेची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ चौकशी करावी, संबंधित परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून त्यावेळी उभ्या असलेल्या सर्व वाहनांची माहिती घ्यावी आणि कारवाई समान निकषांवर झाली का, याची खातरजमा करावी, अशी मागणी संबंधित वाहनचालकाने केली आहे.

**वाहतूक शाखेच्या कारवाईवर नागरिकांचा प्रश्नचिन्ह**

शहरातील अनेक नागरिकांकडून वाहतूक शाखेच्या कार्यपद्धतीबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. कारवाईपूर्वी वाहनांचे मोबाईलवर छायाचित्रण करण्यात येते, मात्र त्या प्रक्रियेचा उद्देश आणि त्यानंतरची निवडक कारवाई याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम असल्याचे बोलले जात आहे.

**फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी; कारवाई मात्र अपुरी?**

छत्रपती शिवाजी महाराज चौक, पोस्ट ऑफिस रोडसह शहरातील अनेक प्रमुख मार्गांवर फेरीवाल्यांनी रस्त्याच्या कडेला कायमस्वरूपी व्यवसाय थाटल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळे वाहनचालकांना वाहने रस्त्यावरच उभी करावी लागतात, अशीही नागरिकांची तक्रार आहे.

मात्र, या अतिक्रमणांकडे वाहतूक शाखेकडून अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा आरोप केला जात आहे.

जुन्या ऑटो रिक्षा आणि परजिल्ह्यातील पासिंगच्या वाहनांकडेही दुर्लक्ष? नागरिकांच्या मते, स्क्रॅपमध्ये जाण्याच्या स्थितीतील अनेक ऑटो रिक्षा आजही शहराच्या रस्त्यांवर प्रवासी वाहतूक करत आहेत. तसेच एमएच-२१ व्यतिरिक्त इतर जिल्ह्यांच्या पासिंगच्या ऑटो रिक्षाही नियमबाह्यपणे धावत असल्याची चर्चा आहे. अशा वाहनांवर सातत्यपूर्ण कारवाई करण्याऐवजी सामान्य नागरिकांच्या वाहनांवरच अधिक भर दिला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**नियम सर्वांसाठी समान असावेत**

वाहतूक नियमांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असले तरी त्यांची अंमलबजावणीही सर्वांसाठी समान आणि पारदर्शक असणे तितकेच आवश्यक आहे. विशेषतः रुग्णालय परिसरात आपत्कालीन परिस्थितीत आलेल्या नागरिकांशी कायद्याच्या चौकटीत राहून मानवी दृष्टिकोनातून वागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणामुळे जालना शहरातील वाहतूक व्यवस्थापन, निवडक कारवाई आणि अतिक्रमणांबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

# श्रीसंत मुक्ताबाई पंढरपूर वारीतील भाविकांची चरणसेवा व मोफत वैद्यकीय सेवा उत्साहात संपन्न

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना व गुरूमिश्री होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने सेवाभावी उपक्रम

**जालना । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायातील ''सेवा हीच परमधर्म'' या विचाराला मूर्त स्वरूप देत महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सचिवालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना आणि गुरूमिश्री होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शेलगाव (ता. बदनापूर, जि. जालना) यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीसंत मुक्ताबाई पंढरपूर वारीतील भाविकांसाठी चरणसेवा व मोफत वैद्यकीय सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ९ या वेळेत विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कन्हैया नगर, जालना येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात यशस्वीरीत्या पार पडला.

पंढरपूर वारीसाठी निघालेल्या वारकरी भाविकांची सेवा करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात शेकडो भाविकांना चरणसेवा देण्यात आली. यासोबतच त्यांची आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला तसेच गरजेनुसार औषधांचेही मोफत वितरण करण्यात आले. दीर्घ अंतराचा पायी प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांना होणारा शारीरिक थकवा, पायांना आलेल्या जखमा, सूज, वेदना तसेच इतर किरकोळ आरोग्य समस्यांवर तत्काळ उपचार करण्यात आले. त्यामुळे भाविकांनी या सेवेचे मनापासून स्वागत करत आयोजकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

उपक्रमासाठी गुरूमिश्री होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे डॉक्टर, प्राध्यापक, इंटर्न डॉक्टर, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक यांनी सेवाभावाने काम करत प्रत्येक भाविकाची काळजी घेतली. वैद्यकीय सेवा आणि अध्यात्माचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध नियोजन, उत्तम समन्वय आणि स्वयंसेवकांच्या सक्रिय सहभागामुळे कोणताही अडथळा न येता यशस्वीरीत्या पूर्ण झाला.

कार्यक्रमास विविध प्रशासकीय, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन उपक्रमाची पाहणी केली व आयोजकांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. यामध्ये जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल मॅडम,आयुक्त मॅडम श्रीमती अंजली शर्मा , मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कृष्णकांत कनवरिया, जिल्हा शल्य (पान २ वर)

# ऑनलाइन शॉपिंगमध्ये चुकीचे उत्पादन, फ्लिपकार्टला दीड लाखांचा दंड

**जालना - प्रतिनिधी**

ऑनलाइन शॉपिंग प्लॅटफॉर्म फ्लिपकार्टवरून मागवलेल्या एअर प्युरिफायरच्या बदल्यात दुसरेच मॉडेल पाठवणे आणि त्यानंतर ग्राहकाच्या तक्रारीची दखल न घेणे फ्लिपकार्टला चांगलेच महागात पडले आहे. आदिलाबाद जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने या प्रकरणात फ्लिपकार्ट इंटरनेट प्रायव्हेट लिमिटेडला सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापार पद्धतीसाठी जबाबदार धरून दीड लाखांपेक्षा जास्त रकमेचा दंड ठोठावला आहे. दिवाळीच्या काळात ॲलर्जी आणि धुळीच्या त्रासामुळे तातडीने खरेदी केलेल्या उत्पादनाबाबत झालेल्या या हलगर्जीपणामुळे ग्राहकाला झालेल्या मानसिक त्रासाची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

या प्रकरणात, तक्रारदार राठोड स्वास्तिक यांनी २ ऑक्टोबर २०२५ रोजी फ्लिपकार्टवरून १०,३९९ रुपये किमतीचा 'क्युबो क्यू६००' मॉडेलचा एअर प्युरिफायर मागवला होता. सवलतीनंतर त्यांना हे उत्पादन ८,३९८ रुपयांना मिळाले. १६ ऑक्टोबर रोजी फ्लिपकार्टच्या 'ओपन बॉक्स डिलिव्हरी' (ओबीडी) अंतर्गत जेव्हा उत्पादन आले, तेव्हा त्यांना मागवलेल्या क्यू६०० मॉडेलऐवजी क्यू५०० हे कमी किमतीचे मॉडेल दिल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी डिलिव्हरी करणाऱ्या व्यक्तीला ओबीडी पॉलिसीनुसार डिलिव्हरी अयशस्वी नोंदवण्यास सांगितले, परंतु डिलिव्हरी स्वीकारल्यानंतरच बदलीची () प्रक्रिया करता येईल.

# जालना व बदनापुर तालुका जि.प.शिक्षक सह.पतसंस्थेच्या चेअरमनपदी श्री.सुभाष भडांगे यांची निवड

**दत्ता देशमुख**

सविस्तर असे की, तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी प्राथमिक शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष तथा शिक्षक पतसंस्थेचे संचालक श्री.सुभाष भडांगे यांची निवड करण्यात आली.

दिनांक ५ जूलै २०२६, रविवार रोजी सकाळी ११वाजता अध्यासी अधिकारी श्री.शरद तनपुरे (जिल्हा उपनिबंधक कार्यालय जालना) यांच्या उपस्थितीत वरील पदासाठी लोकशाही पद्धतीने निवडणूक संपन्न झाली. यावेळी शिक्षक उत्कर्ष पॅनलच्या वतीने श्री सुभाष



भडांगे यांनी उमेदवारी दाखल केली होती. यात १० विरुद्ध ५ अशा मतांनी त्यांचा विजय होऊन संस्थेच्या चेअरमनपदी निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. या निवडीबद्दल व्हाईस चेअरमन श्रीमती साधना गिऱ्हे(जैवाळ),खजिनदार श्री. अरुण जाधव, सचिव श्री. संतोष देशपांडे, संचालक सर्वश्री.रमेश हुशे,विकास पोथरे,जगत घुगे,जगन्नाथ शिंदे, सुभाष भडांगे, गणेश भुतेकर, दिनेश एखंडे, सचिन गंगावणे, रघुनाथ वाघमारे, देवेंद्र बारगजे, मधुकर काकडे, संचालिका श्रीमती वैशाली देशमुख तज्ञ संचालक श्री. बबनराव बोरुडे यांनी अभिनंदन केले आहे.

यावेळी (पान २ वर)

# बालस्नेही महाराष्ट्रसाठी राज्यव्यापी मोहीम

# जिल्हाधिकाऱ्यांना बाल संरक्षण व्यवस्थेचा सर्वंकष अहवाल सादर करण्याचे बाल हक्क आयोगाचे निर्देश

## नोंदणीकृत-अनोंदणीकृत बालसंस्था, बाल कल्याण समित्या, नगर बाल संरक्षण समित्या, बालविवाह, बालमजुरी, लैंगिक अत्याचार, दत्तक प्रक्रिया ते फॉस्टर केअरपर्यंत प्रत्येक बाबीचा होणार सखोल आढावा

**जालना -प्रतिनिधी**

राज्यातील प्रत्येक बालकाला सुरक्षित, सन्मानजनक आणि बालस्नेही वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्यभरातील बाल संरक्षण यंत्रणेचा सर्वंकष आढावा घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अध्यक्ष यांना १५ जुलै २०२६ पर्यंत सविस्तर आणि वस्तुनिष्ठ अहवाल आयोगाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच राज्यातील सर्व नगर परिषद आणि नगरपालिकांमध्ये नगर बाल संरक्षण समित्यांच्या स्थापनेबाबत स्वतंत्र अहवालही मागविण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी ही माहिती देताना सांगितले की, आयोगाला केवळ कागदोपत्री माहिती नको असून प्रत्यक्ष पडताळणी करून वास्तव परिस्थिती मांडणारा अहवाल अपेक्षित आहे. त्यामुळे संबंधित विभागांकडून माहिती गोळा करून ती पुढे पाठविण्याऐवजी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः संपूर्ण यंत्रणेचा आढावा घेऊन आवश्यक शिफारशींसह अहवाल सादर करावा, असे स्पष्ट निर्देश आयोगाने दिले आहेत. आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत आणि अनोंदणीकृत निवासी संस्थांची सद्यस्थिती, त्यांची नोंदणी वैध आहे की नाही, इमारतींची सुरक्षितता, अग्निसुरक्षा उपाययोजना, बाल कल्याण समितीचे कामकाज, जिल्हा बाल संरक्षण कक्षाची कार्यक्षमता, विशेष बाल पोलीस पथकाचे कार्य, जिल्हा तपासणी समितीची भूमिका, दत्तक प्रक्रिया, फॉस्टर केअर, स्पॉन्सरशिप, बालसंगोपन योजनांची अंमलबजावणी, बालविवाह प्रतिबंध, बालमजुरी निर्मूलन, बाल भिक्षेकरी पुनर्वसन, बाल लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांतील कार्यवाही, पीडित बालकांसाठी सहाय्यक व्यक्तींची नियुक्ती तसेच जिल्हा, तालुका, ग्राम आणि वॉर्ड स्तरावरील बाल संरक्षण समित्यांच्या कार्याचा सविस्तर आढावा अहवालात अपेक्षित आहे.



डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले की, बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम, २०१५ मधील तरतुदीनुसार जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अध्यक्ष (पान २ वर)

# अल्पसंख्यांकांच्या विविध प्रश्नांबाबत जालन्याचे शिष्टमंडळ राज्य आयोगाच्या अध्यक्षांना भेटले

## जालना जिल्हाधिकारी कार्यालयात लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्हा व शहरातील अल्पसंख्याक समाजासमोरील विविध प्रलंबित प्रश्न, अल्पसंख्याक विकास निधीतील कपात, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्न, उद्योगांसाठी कर्ज मंजुरीतील अडथळे तसेच अल्पसंख्याक वस्त्यांतील विकासकामे आदी गंभीर विषयांबाबत जालना महानगरपालिकेचे नगरसेवक आसिफ अन्सारी, माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, अकील फुरखानी, यासिर सौदागर आणि अझहर अलताफ यांनी रविवार दि. ५ जुलै रोजी नागपूर येथे महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे



अध्यक्ष प्यारे खान यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये अल्पसंख्याक विकास विभागासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधीत झालेली लक्षणीय कपात निदर्शनास आणून दिली. मंजूर निधीपैकी मोठी रक्कम खर्च न झाल्याने अल्पसंख्याक समाजाच्या विविध विकास योजनांवर परिणाम होत असल्याचे सांगत निधीत वाढ करून मंजूर झालेला संपूर्ण निधी खर्च करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडे निधीअभावी स्वयंरोजगार व शैक्षणिक कर्ज योजना प्रभावीपणे राबवल्या जात नसल्याची बाबही मांडण्यात आली. अनेक तरुणांना उद्योग उभारणी व शिक्षणासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य मिळत नसल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा प्रश्नही अत्यंत गंभीर असल्याचे सांगत जालना जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती मिळत नसल्यामुळे त्यांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होत असल्याची व्यथा मांडण्यात आली. तसेच अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये दर्जेदार शाळा व महाविद्यालयांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी (पान २ वर)

# शांती कुंज विषबाधा प्रकरणाची बाल हक्क आयोगाकडून गंभीर दखल

# जिल्हाधिकाऱ्यांना सात दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश!

## चार अल्पवयीन मुलींच्या विषबाधेनंतर स्वतःहून याचिका दाखल

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहरातील शासकीय शांती कुंज महिला राजगृहात चार अल्पवयीन मुलींना झालेल्या कथित अन्नविषबाधा प्रकरणाची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने अत्यंत गंभीर दखल घेतली असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून सात दिवसांच्या आत सविस्तर कृती अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. आयोगाने या प्रकरणात स्वतःहून याचिका दाखल करत प्रशासनाला कठोर शब्दांत जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या निर्देशानुसार अवर सचिव तथा प्रशासकीय अधिकारी वंदना जैन यांनी ३ जुलै २०२६ रोजी जालना जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भातील अधिकृत पत्र पाठविले आहे.

प्राप्त माहितीनुसार, २१ जून २०२६ रोजी रात्री जेवण केल्यानंतर शांती कुंज महिला राजगृहातील चार अल्पवयीन मुलींची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना मळमळ, पोटदुखी आणि चक्कर येण्याचा त्रास सुरू झाल्याने तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालय तसेच जिल्हा महिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार हा प्रकार अन्नातून विषबाधा झाल्यामुळे घडल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. या घटनेची गांभीर्याने दखल घेत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने बाल हक्क संरक्षण आयोग कायदा, २००५ मधील तरतुदींनुसार स्वतःहून याचिका दाखल केली. त्यानंतर २५ जून २०२६ रोजी आयोगासमोर तातडीची सुनावणी पार पडली. सुनावणीनंतर जिल्हा प्रशासनाला अनेक महत्त्वाचे निर्देश देण्यात आले आहेत.

आयोगाने स्पष्ट केले आहे की, शासकीय बालगृहे आणि महिला राजगृहे यांसारख्या संवेदनशील संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या बालकांच्या आरोग्य, सुरक्षितता, पोषण आणि सन्मानाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची आहे. अशा ठिकाणी घडलेल्या या प्रकारामुळे संस्थेतील अन्नाचा दर्जा, स्वच्छता, आरोग्यविषयक सुविधा, अंतर्गत व्यवस्थापन आणि देखरेख यावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे, संबंधित मुलींनी यापूर्वीही अशाच प्रकारचा त्रास झाल्याचा तसेच संस्थेतील काही कर्मचाऱ्यांकडून मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप केल्याची नोंद आयोगाने घेतली आहे. त्यामुळे केवळ विषबाधेपुरती चौकशी न करता (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.